# संशोधनावर चर्चा म्हणजे विद्यार्थ्यांना मिळणारी महत्वपूर्ण संधी

(22.01.2020) विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रियेवर होणारी चर्चा महत्वपूर्ण व दिशादर्शक असते त्यातूनच संशोधक वृती वाढीस लागते असे प्रतिपादन फार्मसी महाविद्यालय जामनेर च्या विद्यार्थीनी रविना जाधव यांनी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे विद्यापीठ स्तरीय संशोधनपद्धती कार्यशाळेचे उदघाटन करताना केले

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव प्रायोजित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड आयोजित एक दिवसीय विद्यापिठ स्तरीय संशोधन पद्धती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ अरविंद चौधरी होते तर प्रमुख अतिथी म्हणून कार्यशाळेत मुदतीत प्रथम नोंदणी करणारा विद्यार्थी महेश पाटील व प्रथम नोंदणी करणारी विद्यार्थिनी रविना जाधव (फार्मसी महाविद्यालय जामनेर) तसेच डॉ खलसे (चाळीसगाव)डॉ सी जे पाटील (मुक्ताईनगर)डॉ येवले (भुसावळ)डॉ वाघूळदे (जळगांव) इ उपस्थित होते

विद्यार्थी संशोधकाला सर्वच स्थरातून सहकार्य, पाठबळ व प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे त्याशिवाय संशोधन गतिमान होणार नाही शासनाने संशोधकाच्या संशोधनाचा सन्मान करणे व निर्णप्रक्रियेत वापर आवश्यक आहे त्याशिवाय देशाचा, समाजाचा विकास होणार नाही असे मत प्राचार्य डॉ अरविंद चौधरी यांनी अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले

पदव्युत्तर विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सदर कार्यशाळा आयोजनाचे महाविद्यालयात दुसरे वर्ष असून या कार्यशाळेत जळगांव भुसावळ जामनेर मुक्ताईनगर चाळीसगाव येथील सुमारे 85 विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात डॉ सचिन येवले, द्वितीय सत्रात डॉ ए टी कळसे तृतीय सत्रात डॉ राजेंद्र वाघूलदे तर चौथ्या सत्रात डॉ सी जे पाटील यांनी शास्त्रीय संशोधन पद्धती गरज, महत्व, उपयुक्तता, प्रक्रिया, निष्कर्ष याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सपना दोदाणी व प्रा सायली राणे यांनी केले तर प्रस्थाविक कार्यशाळा सचिव डॉ गीता पाटील यांनी केले, आभार प्रदर्शन कार्यशाळा समन्वयक प्रा नरेंद्र जोशी यांनी केले कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विज्ञान विद्याशाखेच्या सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले









